# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील रात्रशाळांमधील समस्या सोडविण्याबाबत**

**(१) ५६४ (०७-०४-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्रशाळांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी रात्र शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या शिष्टमंडळाने विविध मागण्यासंदर्भात माहे ऑगस्ट २०१८ मध्ये वा त्या दरम्यान शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने रात्र शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) यासंदर्भात शासनाने शासन निर्णय, दिनांक १७.१.२०२२ अन्वये रात्रशाळेबाबत सर्वंकष अभ्यास करुन परिपूर्ण धोरण निश्चित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, दिनांक १७.५.२०१७ चा पुनर्विचार करण्यासाठी उच्च स्तरीय समिती स्थापन केलेली आहे. उच्च स्तरीय समितीने केलेल्या शिफारशीं संदर्भात शासन निर्णय दि.३०.०६.२०२२ अन्वये रात्रशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती व अन्य सर्वसाधारण बाबींबाबत सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पवित्र संकेत स्थळाव्दारे राबविण्यात येत असलेल्या शिक्षक भरतीबाबत**

**(२) ७२२ (०९-०४-२०२०). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवित्र संकेत स्थळाव्दारे राबविण्यात येत असलेल्या दुस-या टप्प्यातील शिक्षक भरती प्रक्रियेतून अनुसूचीत जमाती प्रवर्गातील शिक्षक भरती वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रवर्गातील शिक्षक भरती वगळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अनुसूचीत जमाती प्रवर्गातील शिक्षक भरतीसाठी कोणती वेगळी प्रक्रिया राबविण्यात आली वा येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(३) १६६६ (२३-०४-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षकांची भरती करताना शिक्षण सेवक योजना अंमलात आणून २० वर्षे होवूनही शिक्षण सेवकांच्या अत्यल्प मानधनात वाढ करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास दिनांक. १७ सप्टेंबर, २०११ रोजी वा त्यासुमारास मानधन वाढविण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असूनही अद्यापही शिक्षण सेवकांना त्याचा लाभ देण्यात आलेला नाही, हेही खरे आहे काय ,

(३ ) असल्यास, शासन निर्णय निर्गमित करून वाढविलेल्या मानधनाचा लाभ न देण्याची कारणे काय आहेत ?

(४) असल्यास शिक्षण सेवकांना मानधन वाढीचा लाभ केंव्हापर्यंत देण्यात येईल?

**श्री. दिपक केसरकर (१३-१२-२०२२) :**१), (२), (३) व (४) सद्यस्थितीत राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालयांमध्ये कार्यरत शिक्षण सेवकांना मिळणारे मानधन दिनांक १७.९.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार देण्यात येत आहे.

त्यामध्ये अद्यापपर्यंत वाढ करण्यात आलेली नाही. दरम्यानच्या कालावधीत वाढती महागाई, राज्य स्थनिक स्वराज्य संस्था तसेच अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि अध्यापक महाविद्यालयातील नियमित शिक्षकांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू झाली असल्यामुळे शिक्षण सेवक यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**तांबेवाडी(ता.नांदगांव) तसेच पांझणदेव(ता. मनमाड) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४) ७२७६ (१०-०४-२०२०). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तांबेवाडी (ता.नांदगाव) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत इयत्ता १ ली ते ४ थी च्या वर्गात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या १०३ असून त्यांना शिक्षण देणा-या शिक्षकांची संख्या केवळ ४ आहे, तसेच पांझणदेव (ता. मनमाड) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच्या वर्गासाठी केवळ ३ शिक्षक कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांची संख्या कमी असल्यामुळे उक्त दोन्ही शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून सदर विद्यार्थ्यांना शाळा सोडण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सद्य:स्थितीत तात्पुरत्या स्वरुपात शिक्षकांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच जिल्हांतर्गत बदलीद्वारे रिक्त पदे भरण्याबाबतची दक्षता घेण्यात येत आहे.

---

### कर्जत (जि.रायगड) येथील पंचायत समितीच्या शिक्षण विभागाकडून रेड झोन मधील शिक्षकांना रजेचे अर्ज भरून देण्याची सक्ती करण्यात आल्याबाबत

**(५) ११५४७ (१३-०९-२०२०). श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत पंचायत समितीच्या (जि.रायगड) शिक्षण विभागाने रेड झोन मधील २०८ शिक्षकांना दिनांक २३ मार्च पासून दिनांक ३१ मे, २०२० पर्यन्तचे रजेचे अर्ज भरून देण्याचे आदेश दिनांक १७ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व या आदेशामुळे शिक्षकांना त्यांचे वेतन मिळणार की नाही या विवंचनेत उक्त शिक्षक असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ येण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कर्जत तालुक्यात कार्यरत असलेल्या रेड झोन मधील शिक्षकांवर व त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येऊ नये यासाठी कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे वा याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिति काय आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) अशी बाब नाही.

(२) हे खरे नाही.

(३) कर्जत तालुक्यातील सर्व प्राथमिक शिक्षकांचे माहे जून २०२० पर्यंतचे वेतन यापूर्वीच अदा करण्यात आले असून कोणत्याही शिक्षकांना रजेविषयी या कार्यालयाकडून लेखी आदेश देण्यात आलेले नाही.

(४) अशी बाब नाही.

---

### शिक्षक भरतीवरील बंदी उठवून टीईटी उत्तीर्ण सर्व उमेदवारांना नोकरी मिळण्याबाबत

**(६) १६९९८ (२६-११-२०२०). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षक होण्यासाठी शिक्षक पात्रता प्रमाणपत्र (टीईटी) परीक्षा पास होणे बंधनकारक करण्यात येऊन राष्ट्रीय शिक्षक परिषदेने (एनसीटीई) सन २०११ मध्ये याबाबतचे परिपत्रक काढले व सन २०१३ मध्ये पहिली शिक्षक पात्रता प्रमाणपत्र परीक्षा घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक पात्रता प्रमाणपत्राची वैधता फक्त सात वर्षेच असून या परिक्षेत सन २०१३ ते २०१९ या कालावधीत एकूण ८६ हजार २९८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असले तरी राज्यातील पट पडताळणीनंतर हजारो शिक्षक अतिरिक्त झाल्यामुळे आणि शिक्षक भरतीच्या प्रक्रियेतील गोंधळामुळे शासनाने शिक्षक भरतीवर बंदी घातली असून मागील सात वर्षात यातील अत्यल्प उमेदवारांनाच नोकरी मिळू शकली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परीक्षेत सन २०१३ मध्ये उत्तीर्ण उमेदवारांची वैधता दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी संपणार असल्याने दिनांक ३१ डिसेंबर, २०२० अखेर नोकरीची संधी न मिळाल्यास उर्वरीत ३१ हजार उमेदवार बेरोजगार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुसार टीईटी उत्तीर्ण सर्व उमेदवारांना न्याय देऊन नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१३-१२-२०२२) :**(१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शिक्षक पात्रता परीक्षेची वैधता कायमस्वरुपी केली आहे.
(४) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चे आयोजन आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्याच्या सूचना शासन पत्र दिनांक ०७.११.२०२२ अन्वये दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षकांच्या बेकायदेशीर भरतीबाबत

**(७) ३२२७७ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०११ पासून शिक्षक भरतीवर बंदी असूनही शिक्षण विभागातील अधिकारी व शिक्षण संघटनेचे पदाधिकारी संगनमत करून बनावट कागदपत्रांच्या आधारे बेकायदा शिक्षक भरती केल्याचा गैरप्रकार माहे जानेवारी, २०२१ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हजारो शिक्षकांची अनधिकृतरित्या भरती झाल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच एकूण किती शिक्षकांची भरती करण्यात आली आहे, त्यासाठी शासनाला वेतनापोटी किती रुपयांची अदायगी करावी लागणार आहे,
(३) असल्यास, शिक्षक भरती अनधिकृत असल्याने भरती केलेल्या शिक्षकांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) सन २०१२ नंतर पदभरतीस बंदी असतानाही, ६४६ प्रकरणांत अनियमित मान्यता प्रदान करण्यात आलेल्या एकूण ८८ प्रकरणांत मान्यता रद्द करण्यात आल्या आहेत. राज्यातील ज्या जिल्ह्यात वैयक्तिक मान्यता अनियमित ठरल्या त्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सैनिकी शाळेचे आदिवासी तुकडीवरील कर्मचा-यांच्या वेतनाबाबत

**(८) ३२५६८ (१२-०१-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी उपाय योजना अंतर्गत ३६ शालेय शिक्षण विभागांतर्गत लेखाशीर्ष २२०२H९७३ हे सैनिकी शाळेचे आदिवासी तुकडीवरील कर्मचाऱ्यांच्या वेतनाकरीता असूनही राज्यातील सैनिकी शाळेचे आदिवासी तुकडीवरील कर्मचाऱ्यांना मागील सहा महिन्यांपासून वेतन अदा करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२२-१२-२०२२) :** (१) व (२) शालेय शिक्षण व क्रीडा विभागास आदिवासी क्षेत्रातील माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा आणि सैनिकी शाळांच्या आदिवासी तुकड्यावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतनासाठी आदिवासी विकास विभागाकडून आर्थिक तरतुद उपलब्ध करून दिली जाते. सन २०२१-२२

या आर्थिक वर्षात विभागाच्या मागणीपेक्षा आदिवासी विकास विभागाकडून २२०२H९७३ या लेखाशीर्षाखाली अल्पशी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली. त्यानुसार सदर लेखाशीर्षाखाली उपलब्ध झालेल्या तरतुदीतून वेतन अदा करण्यात आलेले आहे. सदर लेखाशीर्षाकरिता यापुढील कालावधीतील वेतनासाठी आवश्यक असणारी अतिरिक्त तरतूद पुरक मागणीद्वारे उपलब्ध करुन घेण्यात आली.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नायगांव विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक असल्याबाबत**

**(९) ३३६६६ (१२-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगांव विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत डिजिटल क्लासरूम होणेकरिता उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) नांदेड जिल्ह्यात केंद्र शासनाने मंजूर केलेल्या ३५ शाळांसाठी समग्र शिक्षा योजनेतून आयसीटी संगणक प्रयोगशाळांसाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये रू. २.१७/- कोटी एवढा निधीपैकी रू. ४३.४०/- लाख एवढ्या रकमेचे संगणकीय साहित्य नायगांव विधानसभा मतदारसंघातील ७ शाळांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.
प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होत असल्याबाबत**

**(१०) ३४१९० (१२-०१-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होत असून सन २०१४-१५ ते २०१८-१९ या काळात विद्यार्थी संख्येत सुमारे १३,२७१ इतकी घट झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परीषद शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शालेय शिक्षण खात्यामार्फत उपाययोजना केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, जिल्हापरिषद शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेश घेत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबा कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१४-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शालेय शिक्षण विभागामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थेतील शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश,पाठ्यपुस्तक इत्यादी साहित्य वितरित करण्यात येते. पटनोंदणी,पंधरवाडा,शाळाबाह्य विद्यार्थी शोध मोहीम, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र तसेच अकोला जिल्हा परिषद उपकर अंतर्गत पटसंख्या वाढलेल्या जिल्हा परिषद शाळांचा गौरव करण्यासाठी योजना राबविण्यात येत आहे. सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये प्रत्येक तालुक्यातील प्रथम तीन शाळांची पटसंख्या वाढल्याने रोख बक्षीस देऊन गौरव करण्यात येतो. सन २०२१-२२ मध्ये शालेय शिक्षण विभागामार्फत अकोला जिल्ह्यातील नऊ आदर्श शाळेची निवड करून उच्च दर्जाच्या शाळा निर्माण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) होय, अंशत: खरे आहे.
(४) जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शासनामार्फत समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश,शालेय पोषण आहार योजना इ. योजनेचा लाभ देण्यात येत आहे तसेच शाळांना अनुदान,शाळा दुरूस्ती अनुदान तसेच सन २०२१-२२ मध्ये अकोला जिल्ह्यातील शाळांना आदर्श शाळा निर्माण करण्यासाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील हैद्राबाद, विजापूर, पुणे, कोल्हापूर येथे जाण्यासाठी असलेल्या राष्ट्रीय महामार्गावरुन होणा-या अपघाताबाबत.**

**(११) ३६३७३ (११-०१-२०२२). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील हैद्राबाद, विजापूर, पुणे, कोल्हापूर येथे जाण्यासाठी असलेल्या राष्ट्रीय महामार्गावरुन मोठया प्रमाणात जड वाहतूक होते त्यामुळे या महामार्गावर वांरवार अपघात होऊन प्राणहानी होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग १ च्या अनुषंगाने शासनाने उड्डाणपुल प्रस्तावित केला असुन त्याकरिता २.९९ कोटी रुपयाची निधी मंजूर केला आहे परंतू अद्यापही त्यापुढील कोणतीही आवश्यक कार्यवाही केलेली नाही तसेच बाहयवळणासाठी भूसंपादनासाठी हरकत घेणा-यांची संख्या कमी असते त्यामुळे उक्त उड्डाणपुलाच्या भूसंपादनासाठी लागणारा वेळ लक्षात घेता उड्डाणपुलाकरिता मंजूर झालेला निधी बाहयवळण (रिंगरोड ) करिता जरी शासनाने वळविला तरी सोलापूर शहरातील जडवाहतूकीचा प्रश्न तसेच अपघातही काही प्रमाणात कमी होतील तरी शासन प्रश्न भाग १ व २ मधील विषयाचे गांर्भीर्य लक्षात घेऊन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०२-०१-२०२३) :** (१) अंशत:खरे आहे.
सोलापूर शहरामधुन जात असलेल्या रस्त्यावर जडवाहतुक होत असते, त्यामुळे काही प्रमाणात अपघात होऊन प्राणहानी झालेली आहे.
(२) सोलापूर शहरातील उड्डाणपूल बांधणे केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण सोलापूर यांचेमार्फत प्रस्तावित असून त्याबाबत प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,सोलापूर यांनी कळविलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे :-
सोलापूर-विजयपूर वरील बसवेश्वर नगर ते हत्तूर या २१ कि.मी.चे बाहयवळणाचे काम पूर्ण झाले आहे व बाळे ते बसवेश्वर नगर हे बाहयवळणाचे काम लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे.
सदर प्रस्तावित उड्डाणपूल सोलापूर महानगर पालिकेच्या क्षेत्रात बांधण्यात येणार असल्याने महानगरपालिकेकडून जमीन संपादीत करुन प्राधिकरणाच्या ताब्यात देणे आवश्यक आहे. त्यादृष्टिने राज्य शासनाच्या महसूल व वन विभाग व नगर विकास विभागाने व स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत भूसंपादन प्रक्रिया महसूल व वन विभागाच्या धोरणानुसार प्रगतीत आहे.
सोलापूर शहराबाहेरुन जाणारा बाहयवळण रस्ता राज्य मार्ग २०५ हा हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल या कार्यक्रमाअंतर्गत शासनाच्या अर्थसंकल्पात मंजूर असुन सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी शहरालगत नवीन एमआयडीसी उभारणीबाबत

**(१२) ३६८४० (१२-०१-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरात असलेल्या एमआयडीसीमध्ये एकही भूखंड नवीन उद्योगासाठी उपलब्ध नसल्याने मागील १०-१२ वर्षापासून परभणीचा औद्योगिक विकास थांबलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी शहरालगत नवीन एमआयडीसी उभारणीकरीता अनेक उद्योजगांनी भूखंडाची मागणी केलेली असून याप्रकरणीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन एमआयडीसी उभारणीकरीता परभणी शहरालगत बोरवंड आणि उजळआंबा शिवाराजतील शेतजमीनी राखीव ठेवलेल्या असून केवळ शेतजमीन दर निश्चीती करण्याच्या प्रक्रियेमुळे नवीन एमआयडीसी उभारणीस विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, परभणीचा औद्योगिक विकास व्हावा व उद्योजगांच्या भूखंडाच्या मागणीनुसार व बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने परभणी येथे नवीन एमआयडी उभारणीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये उद्योगमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०९-०१-२०२३) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने परभणी औद्योगिक क्षेत्रासाठी सन १९७४ साली ९५.६४ हे.आर जमीनीचे संपादन केलेले असून सदर संपादीत जमीनीचे एकूण २७४ औद्योगिक व व्यापारी भूखंडाचे आरेखन करण्यात आलेले आहे.
सदरील औद्योगिक क्षेत्रातील सर्व भूखंड उद्योजकांना वाटप झाल्याने सद्यःस्थितीत त्याठिकाणी एकही भूखंड वाटपास उपलब्ध नाही, हि वस्तुस्थिती आहे.
तथापि परभणी औद्योगिक क्षेत्रात भूखंड वाटपास उपलब्ध नसल्याने स्थानिक उद्योजक व लोकप्रतिनिधी यांची मागणी विचारात घेऊन नव्याने औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरीता मौजे बाभुळगांव व उजळंबा येथील एकूण खाजगी ७०२.०५ हेक्टर आर क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास १९६१ मधील प्रकरण ६ ची अधिसूचना दि.०७/०२/२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.
तसेच सदर क्षेत्राची ३२ (२) ची अधिसूचना दिनांक १९/७/२०१२ रोजी राजपत्रात प्रसिध्द झालेली आहे.
मौजे उजळंबा येथील शेतक-यांचा संपादनास तीव्र विरोध आहे.त्यामुळे सदर परिसरातील कापूस उत्पादकासाठी औद्योगिक क्षेत्र विकसित करणे अधिक उचित असल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार सदर जमिनी Pass through पध्दतीने वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
त्याअनुषंगाने दिनांक ४/१/२०१९ रोजी मे. रेमंड प्रा. लि. या कंपनीने प्रस्तावित क्षेत्राची पहाणी केली आहे. दरम्यान परभणी येथे नवीन एमआयडीसी उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी मार्फत प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने अति. परभणी औद्योगिक क्षेत्रासाठी अधिसुचित करण्यात आलेल्या जमिनीची दि.२५/०३/२०२२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पाहणी केली
असून भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्धवत नाही.

---

## मुंबई ते नाशिक महामार्गावर कसारा ते भिवंडी पर्यंत ठिकठिकाणी रस्ते महामार्गाच्या नियमांची पायमल्ली करुन दुभाजक तोडण्याबाबत

**(१३) ३८६१६ (३०-०३-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई ते नाशिक महामार्गावर कसारा ते भिवंडी पर्यंत ठिकठिकाणी रस्ते महामार्गाच्या नियमांची पायमल्ली करुन दुभाजक तोडण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे का,

(२) असल्यास, सदर दुभाजक बेकायदेशीर तोडल्यामुळे या रस्त्यांवरील अपघाताचे प्रमाणही वाढले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

मुंबई-नाशिक हया राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

बेकायदेशीरपणे दुभाजक तोडुन मार्गिका तयार करण्याचा प्रयत्न स्थानिक रहिवाशी व इतर व्यवसायिक यांचेकडून केला जातो. वाढते शहरीकरण व दुतर्फा नव्याने झालेल्या नागरी वसाहती, लॉजिस्टीक पार्क तसेच व्यावसायिक हितापोटी दुभाजक तोडण्यासाठी प्रयत्न होत असतो.

(२) बेकायदेशीरपणे दुभाजक तोडल्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(३) सद्यस्थितीत वडपे-गोंदे या सेक्शनमध्ये पाच ठिकाणी बोगदे/उड्डाणपुलाची काम EPC अंतर्गत चालू आहेत. तसेच वडपे ते राजनोली (भिवंडी) या रस्त्यावर सदयस्थितीत सात अनधिकृत तोडलेल्या दुभाजकांपैकी पाच दुभाजकांमधील गॅप बंद करण्यात आला असून उर्वरीत दोन ठिकाणी दुभाजकामधील गॅप बंद करण्यास स्थानिकांनी विरोध केला आहे. सदर गॅप जिल्हा प्रश्नासनाच्या मदतीने बंद करण्याचे नियोजन आहे.

बेकायदेशीरपणे दुभाजक तोडून तयार केलेल्या अनधिकृत मार्गिका नियमित बंद केल्या जातात. तेथे MBCB किंवा Concrete Barrier ठेवली जातात. अपराध्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असे फलक सदरहू ठिकाणी लावले जातात. वारंवार तोडल्या जाणा-या ठिकाणी अपराध्यांवर गुन्हे नोंदविले जातात.

(४) प्रश्न अद्भवत नाही.

---

### आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील अन्न नागरी पुरवठा विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) ३८९६९ (०९-०४-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) येथे तहसील कार्यालयाची सन १९९२ मध्ये स्थापना होऊन २८ वर्षे पुर्ण होऊनही कार्यालयातील आकृतिबंधात पदांना मान्यता नसल्यामुळे सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत असून अनेक कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तहसील कार्यालयातील महसूल सहायकांची तीन पदे अनेक वर्षापासून रिक्त असल्याने कार्यालयातील एका कर्मचाऱ्यांना दोन ते तीन अधिकची कामे करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या संजय गांधी निराधार विभागातील एक नायब तहसीलदार, एक अव्वल कारकून, तीन महसूल सहायक आणि एक शिपाई तसेच पुरवठा विभागात पुरवठा निरीक्षक, फूड सप्लाय इन्सपेक्टर, अव्वल कारकून, कार्ड लिपिक, परमीट लिपिक, एक शिपाई इत्यादी पदे रिक्त असल्यामुळे तालुक्यातील कामे प्रलंबित रहात असल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०१-१२-२०२२) :** (१) या विभागाचा सुधारित आकृतीबंध दिनांक ४ जुलै, २०२२ रोजी निर्गमित झाला असून यवतमाळ जिल्हास्तर व तालुका स्तरासाठी सर्व संवर्गाच्या एकूण १६१ पदांना मंजूरी देण्यात आली आहे. आर्णि (जिल्हा यवतमाळ) येथे निरीक्षण अधिकारी-१, पुरवठा निरीक्षक-१, गोडाऊन मॅनेजर-१, लिपिक-२, गोडाऊन

लिपिक-१ शिपाई-२ अशी एकूण ८ पदे सुधारित आकृतीबंधानुसार उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. यापूर्वी आर्णी (जि.यवतमाळ) येथे एक पुरवठा निरीक्षक व एक अव्वल कारकून यांना प्रतिनियुक्तीवर पाठवून पुरवठा विभागाची कामे सुरळीत पार पाडण्यात आली आहे.
(२) तहसिल कार्यालय, आर्णी जि.यवतमाळ येथे नायब तहसिलदारांची तीनही पदे भरलेली आहेत. आर्णी तालुक्यामध्ये संगायो व इंगायो तसेच श्रावणबाळ विभागाचे कामकाज एक महसूल सहायक सांभाळतात.
(३)संजय गांधी निराधार विभागाची पदे आकृतीबंधात मंजूर नाहीत. परंतु इतर अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून जनतेची कामे करुन घेतल्या जातात. कामे प्रलंबित ठेवण्यात येत नाहीत.
(४)प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील शाळांमधील शिक्षकांच्या अपुऱ्या संख्येमुळे विद्यार्थ्यांचे मोठयाप्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असल्याबाबत

**(१५) ४०२९३ (०९-०४-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांच्या अपु-या संख्येमुळे विद्यार्थ्यांचे मोठयाप्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपु-या शिक्षकांमुळे इतर शिक्षकांना स्वत:चे वर्ग सांभाळून इतर वर्गांकडेही लक्ष दयावे लागत असल्यामुळे इतर जबाबदाऱ्या पार पाडताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षकांवरील अधिकचा वाढता ताण लक्षात घेता त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१३-१२-२०२२) :** (१) व (२) अशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) राज्यातील पदभरतीस असलेली बंदी वित्त विभागाने शिथिल केली आहे. याअनुषंगाने शालेय शिक्षण विभागांतर्गत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या पदभरतीस वित्त विभागाची मान्यता प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षकेतर कर्मचा-यांची विना अनुदानित शाळा अथवा तुकडीवरुन किंवा अंशतः अनुदानित शाळा अथवा तुकडीवरुन पुर्णतः अनुदानित शाळा अथवा तुकडीवर बदलीबाबत

**(१६) ४०४५५ (०९-०४-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षक कर्मचाऱ्यांची विना अनुदानित, अंशत: अनुदानित, किंवा पुर्णत: अनुदानित शाळा अथवा तुकडीवर बदली करण्याबाबत शासन निर्णय झालेला असून याच धर्तीवर शासनाने दि. ०६ एप्रिल २०२१ रोजी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विना अनुदानित शाळा अथवा तुकडीवरुन किंवा अंशतः अनुदानित शाळा अथवा तुकडीवरुन पुर्णतः अनुदानित शाळा अथवा तुकडीवर बदली करण्याबाबत अधिसूचनेचा मसुदा तयार करुन हरकती किंवा सूचना मागविल्या होत्या हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक कर्मचाऱ्यांना विनाअनुदानित कडून अनुदानितकडे केलेल्या बदल्यांना मंजूरी मिळते परंतु अधिसुचनेचा मसुदा तयार करुनही अंतिम निर्णय न झाल्याने शिक्षकेत्तर कर्मचा-यांना अद्याप मंजूरी दिली गेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षकेत्तर पदांना विनाअनुदानित कडून अनुदानितकडे बदलीस मान्यता देण्याबाबत अधिसूचना अथवा शासन निर्णय होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) अधिसूचनेचा अंतिम मसुदा प्रसिध्द करण्यासाठीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खानापुर (ता.देगलूर जि.नांदेड) येथील औद्योगिक क्षेत्रासाठी जमीन संपादित करण्याबाबत

**(१७) ४०८५१ (०९-०४-२०२२). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर (ता.देगलूर जि.नांदेड) येथे मोठया प्रमाणात औद्योगिक कंपन्या सुरु असून सदरील औद्योगिक क्षेत्रात जागा अपूरी पडत असल्याने नविन उदयोगाला चालना देण्यासाठी औद्योगिक क्षेत्राच्या विस्तारासाठी ७८ हेक्टर जमीन संपादित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास उदयोग मंत्री यांनी लेखी निवेदन दिले होते हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०९-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) नांदेड जिल्ह्यामध्ये देगलूर औद्योगिक विकास केंद्राची स्थापना १९८५ साली करण्यात आलेली आहे.
देगलूर औद्योगिक विकास केंद्रासाठी ४७.९१ हे.आर. खाजगी व १५.६३ हे. आर सरकारी अशा एकूण ६३.५४ हेक्टर जमीन संपादन करण्यात आलेली आहे.
सदर औद्योगिक क्षेत्रात एकूण १२१ भूखंड पाडण्यात आले आहेत. त्यापैकी १०१ भूखंड वाटप करण्यात आले असून १७ भूखंड वाटपास उपलब्ध आहेत. तसेच सदर औद्योगिक क्षेत्रास पाणी, रस्ता व पथदिवे यासारख्या मूलभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कल्याण, उल्हास नगर, व अंबरनाथ येथून वाहणाऱ्या वालधुनी नदीतील प्रदुषणात वाढ होत प्रदूषण असल्याबाबत

**(१८) ४१०६३ (०९-०४-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण, उल्हास नगर, अंबरनाथ येथून वालधुनी नदी प्रवाहित होत असून सदर नदीच्या काठावर सुशोभीकरणाचे प्रकल्प राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नदीमध्ये होणारे प्रदूषण रोखण्याबाबत तसेच देश विदेशातील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सदर नदीवरील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) औद्योगिक वसाहतीतील मोठया मध्यम उद्योगांनी सांडपाणी प्रक्रियेसाठी प्राथमिक, द्वितीय व तृतीय दर्जाची सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारलेली आहे. तसेच लघु उद्योजकांनी प्राथमिक स्वरुपाची सांडपाणी सयंत्रणा उभारलेली असून पुढील प्रक्रियेसाठी बदलापूर, अंबरनाथ एमआयडीसी, चिखलोली मोरीवली, तसेच एक्मा एमआयडीसी केमिकल झोन येथे सामूहीक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारलेली आहे.

• उल्हासनगर महानगरपालिका व अंबरनाथ नगरपरिषद यांनी ७५ व २८ दक्षलक्ष लीटर/ दिन या प्रमाणे सांडपाणी प्रक्रिया बसवली असून प्रक्रिया केलेले पाणी वालधुनी नदीद्वारे उल्हासनदीच्या खाडी क्षेत्रात सोडण्यात येते. उल्हासनगर येथे उल्हासनगर महानगरपालिकेने अमृत योजने अंतर्गत उल्हासनगर महाभुयारी गटार योजना टप्पा १ व मलजलशुद्धीकरण केंद्राचे काम टप्पा २ अंतर्गत पूर्ण झाले असून माहे डिसेंबर अंतर्गत कार्यान्वित होईल.

• कल्याण डोबिंवली महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखडयानुसार आरक्षण क्र.१७४ येथे टाऊन पार्क /सिटी पार्क विकसित करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

• मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेरी नाशिक यांचेमार्फत वालधुनी नदीचे सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असून तो शासनाच्या विचारधीन आहे.

• अंबरनाथ नगरपरिषदेने केलेल्या अहवानानुसार स्थानिक सामाजिक संघटना व नागरीक यांच्याकडून लोक सहभागातून स्वखर्चाने सुशोभिकरणाची कामे करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षण क्षेत्रातील पवित्र पोर्टल रद्द करण्याबाबत

**(१९) ४१५५८ (०९-०४-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या शिक्षण क्षेत्रातील पवित्र पोर्टल मध्ये अनेक त्रुटी असून त्या शिवाय शिक्षण संस्था व्यवस्थित चालणार नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सदरील पोर्टल रद्द करण्याची शिक्षण संस्थांतून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीवर निर्णय घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शिक्षकांची नियुक्ती पारदर्शक पध्दतीने व्हावी, याकरीता मा. उच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार पवित्र पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे पवित्र पोर्टल रद्द करण्याबाबतची बाब शासन स्तरावर विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## देवळाली (ता.कळंब जि.उस्मानाबाद) येथील जागृती विद्यामंदीर शाळेतील शिपाई पदाच्या नियमबाह्य नियुक्तीबाबत

**(२०) ४२१४९ (०९-०४-२०२२). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळाली (ता.कळंब जि. उस्मानाबाद) येथील जागृती विद्यालयात सालगडी म्हणून शेतात काम करणाऱ्या गावातीलच एका निरक्षर व्यक्तीला साक्षर दाखवून नियमबाह्यपणे शिपाई पदावर नियुक्ती करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर कर्मचाऱ्याच्या सन २०१६ ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीतील वेतन इतर दुसऱ्या कर्मचाऱ्याच्या नावे देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नियमबाह्यपणे शिपाई पदावर नियुक्ती करुन वेतन अदा करणाऱ्या संस्थाप्रमुख व मुख्याध्यापकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-१२-२०२२) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४)
संबंधित सेवकाची वैयक्तिक मान्यता रद्द करण्यात आली आहे.
माहे सप्टेंबर २०१६ ते ऑक्टोबर २०२० या कालावधीतील वेतन शासन खाती जमा करण्याबाबत मुख्याध्यापकांना कळविण्यात आले. त्यांनी तसे न केल्याने त्यांची मुख्याध्यापक पदावरील पदोन्नती रद्द करण्यात आली आहे. याविरुध्द त्यांनी उच्च न्यायालय मुंबई,खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली आहे.सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.तसेच मुख्याध्यापकाचे वेतन माहे नोव्हेंबर,२०२१ पासून बंद करण्यात आले आहे.

---

**राज्यात विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(२१) ४२२१० (०९-०४-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्या करणाऱ्याचे प्रमाण महाराष्ट्रात अधिकप्रमाणात असून विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्यातील अपुऱ्या संवादामुळे अश्या प्रकारची भूमिका विद्यार्थी घेत आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बदलता अभ्यासक्रम, शिक्षणातील अपयश, पालकांच्या अपेक्षा, वाढती स्पर्धा याच ओझ वाहून होणाऱ्या आत्महत्येचा वाढता कल लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१४-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) याबाबत शासनाने महाकरिअर पोर्टल सुरू केलेले आहे. समुपदेशकांची सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. वेबिनार मालिकांचे आयोजन करण्यात आलेले आहे. राज्यातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा पूर्व कालावधी, परीक्षा दरम्यानचा कालावधी, परीक्षा नंतरचा कालावधी व परीक्षेच्या निकालानंतरचा कालावधी या दरम्यान मोफत स्वरूपात मार्गदर्शन व समुपदेशन सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील डी.एड. शिक्षकांना सेवा ज्येष्ठतेत डावलले जात असल्याबाबत**

**(२२) ४२३७७ (०९-०४-२०२२). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र खाजगी कर्मचारी (सेवा शर्थी) नियमावली १९८१ मधील भाग २ नियम १२ अनुसुची फ मध्ये राज्यातील माध्यमिक शाळांमधील पदवीधर डी.एड. (२वर्षे) शिक्षकांच्या सेवाजेष्ठतेच्या प्रवर्गाबाबत स्पष्ट उल्लेख नसल्याने त्यांना सेवाकनिष्ठ दर्शवून पदोन्नतीपासुन वंचित ठेवण्यात येत असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र माध्यमिक डी.एड. शिक्षक महासंघ (म.रा.) संघटनेच्या मागणीनुसार अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांनी दिनांक ०८ जून,२०२० च्या अधिसुचनेनुसार पदवीधर डी.एड. (२ वर्षे) शिक्षकांना सेवाजेष्ठता प्रवर्ग क मध्ये समाविष्ठ करुन नियमावलीत दुरुस्ती प्रस्तावित केलेली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील माध्यमिक शाळांमधील पदवीधर डी.एड.(२वर्षे) शिक्षकांचा सेवाजेष्ठता प्रवर्ग "क" मध्ये समावेश करुन स्पष्ट व पारदर्शक अध्यादेश काढण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अधिसूचनेचा अंतिम मसुदा प्रसिध्द करण्यासाठीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पटपडताळणीमध्ये दोषी आढळून आलेल्या शाळांकडून कोट्यवधी रुपयांची रक्कम वसूल करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(२३) ४४५०९ (०२-०५-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांमध्ये सन २०११ मध्ये विशेष पटपडताळणी मोहीम राबविण्यात आली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण विभागाच्या वतीने विविध योजना राबविण्यात येतात तसेच विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार शाळांना लाखो रुपयांचे अनुदान वाटप करण्यात येते हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अनेक शिक्षण संस्थाचालकांनी बोगस पटसंख्या दाखवून शासनाकडून कोट्यवधी रुपयांची विद्यार्थी शिष्यवृत्ती आणि ईबीसी सवलतीची रक्कम घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(४) सदर शाळांच्या पटपडताळणीमध्ये दोषी आढळलेल्या शाळांकडून कोटयवधी रुपयांची वसुली करण्याचे आदेश देण्यात आले असुनही अधिकारी याबाबत टाळाटाळ करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी आढळेल्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०८-१२-२०२२) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
काही शाळांबाबत कोर्टाने स्टे ऑर्डर दिल्यामुळे वसूली करण्यास उशीर होत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची पदे रद्द केल्याबाबत

**(२४) ४४५८८ (१७-०९-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने गत १५ वर्षात शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती न केल्याचे तसेच चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांची ५२ हजार पदे रद्द केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवसेंदिवस शाळांमधील मुला मुलींवर अत्याचारांच्या वाढत्या घटना लक्षात घेता त्यांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरुपी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या तसेच चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या भरतील शासनाने परवानगी द्यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेत्तर महामंडाळाने केली आहे ,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शिक्षकेत्तर कर्मचारी व ५२ हजार चतुर्थश्रेणी कर्मचारी यांचे पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :**(१) अंशत: खरे आहे.

सन २०१५ पासून शिक्षकेत्तर पदे भरण्यास बंदी होती. तद्नंतर शासन निर्णय दिनांक २८.०१.२०१९ नुसार शिक्षकेत्तरांचा (चतुर्थश्रेणी) वगळून आकृतीबंध निश्चित करण्यात आला. तथापि, शिक्षण संचालनालय स्तरावरुन पदांची निश्चिती करण्यात न आल्याने पदे भरता आली नाहीत. त्यानंतर कोविडच्या पार्श्वभूमीवर पदभरतीवर बंदी घालण्यात आली होती. तसेच दिनांक ११.१२.२०२० च्या शासन निर्णयानुसार चतुर्थश्रेणी पदाऐवजी शिपाई भत्ता लागू करण्यात आला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यातील विविध विभागांतर्गत रिक्त पदे भरण्याबाबतच्या बंदीस वित्त विभागाने शिथिलता दिली आहे. त्यानुसार शालेय शिक्षण विभागांतर्गत पदभरतीस वित्त विभागाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक ११.१२.२०२० अन्वये शिपाई, नाईक, पहारेकरी, रात्रीचा पाहरेकरी, सफाईगार, कामाठी, तेलवाला, हमाल, परिचर, चौकीदार, प्रयोगशाळा परिचर इ. चतुर्थश्रेणी कर्मचारी पदावर कार्यरत कर्मचारी नियम वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर सदर पदे व्यपगत करुन, यापुढे चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदांऐवजी यापुढे ठोक स्वरुपात "शिपाई भत्ता" अनुज्ञेय करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील**
**विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत असल्याबाबत**

**(२५) ४४६९२ (१७-०९-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा परिषदेच्या गेल्या दहा वर्षाच्या तुलनेने १७ तालुक्यातील सुमारे ३०० प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचा पट दरवर्षी कमी होत असल्याचे माहे मे, २०२२ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमधील दहा वर्षापूर्वी विद्यार्थ्यांची संख्या जवळपास ९ ते १० हजार असताना ही संख्या यावर्षी ६ हजारापर्यंत आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा तसेच दर्जेदार शिक्षण उपलब्ध होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा तसेच दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१४-१२-२०२२) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
जिल्हा परिषदेतील शाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जाते.

(४) जिल्हा परिषदेच्या शाळेमधून दर्जेदार शिक्षण देणेसाठी उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त शिक्षक उपलब्ध आहेत. बऱ्याच शाळांमधून Digital स्वरूपात शिक्षण दिले जाते. शासनाकडून शाळांना गणित,भाषा व विज्ञान पेटीच्या स्वरूपात दर्जेदार शैक्षणिक साधने उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना शासनामार्फत समग्र शिक्षा अभियानांतर्गत

मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शालेय पोषण आहार योजना इ. योजनेचा लाभ देण्यात येत आहे. समग्र शिक्षा अभियान,जिल्हा नियोजन,जिल्हा परिषद सेस फंड व सी.एस.आर. फंड अंतर्गत वर्गखोल्या बांधण्यात आलेल्या आहेत. मुला-मुलींचे स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२६) ४५०७८ (१७-०९-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी कार्यालयात विविध जागा रिक्त असून सदर जागा निरंतर शिक्षण विभागामार्फत भरण्यात येणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निरंतर शिक्षण विभाग जिल्हास्तरीय माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे वर्ग करण्यात आल्याने 'अ' दर्जाचे १७ आणि 'ब' ते 'ड' गटातील इतर कर्मचारी शिक्षण विभागाला मिळणार आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यास्तव शिक्षण विभागाचे ४० कोटीहून अधिक रुपये आणि इतर भत्तेही वाचणार आहेत हे ही खरे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय?
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०९-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे  नाही.
(४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक ०४.०४.२०२२ अन्वये शालेय शिक्षण विभागांतर्गत असलेले शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) कार्यालयाचे कामकाज संबंधित जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण) कार्यालयाकडे तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करण्यात आले होते. तथापि, शासन निर्णय दिनांक २२.६.२०२२ अन्वये शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालयाचे नामांतर शिक्षण संचालनालय योजना असे करण्यात आले असून प्राथमिक शिक्षण संचालनालय तसेच माध्यमिक शिक्षण संचालनालयाकडील योजना शिक्षण संचालनालय (योजना ) कार्यालयाकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. तसेच,
जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालयाची निर्मिती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

### अहमदनगर-मनमाड महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामांमुळे अपघातांच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(२७) ४५३३२ (२५-०९-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर-मनमाड महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम अतिशय संथ गतीने सुरु असल्यामुळे सदर मार्गावर वाहतूक कोंडी होत असून तेथे वारंवार अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गाचे काम करणाऱ्या ठेकेदारांकडून स्थानिक लोकप्रतिनिधींनी टक्केवारीची मागणी केल्यामुळे ठेकेदार काम सोडून गेला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिर्डी, राहुरी, कोपरगांव येथील स्थानिक संघटनांनी याबाबत आंदोलने करुन संबंधित ठेकेदारावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, राहुरी येथे काही संघटनांनी सदर प्रकरणी माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान तीन दिवस आंदोलन करुन देखील प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नसून आंदोलन करीत असताना २ ते ३ अपघाताच्या घटना घडल्या, ही बाबही खरी आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याकरिता तसेच संबंधित दोषी कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०१-२०२३) :** (१) सावली विहीर ते अहमदनगर बायपास पर्यंतचा भाग केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

सद्यस्थितीत सदर रस्त्याचे देखभाल व दुरुस्तीचे काम प्रगतीत असून रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. तसेच रस्ता वाहतुकीस योग्य केलेला आहे. सध्या त्यावर DBM Overlaying चे काम सुरु आहे. सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीस योग्य झाल्यामुळे सदर मार्गावर वाहतूक कोंडी होत नाही तसेच अपघाताचे प्रमाण कमी झालेले आहे.
(२) हे खरे नाही. परंतु खाण उत्खननास परवानगी प्राप्त नसल्यामुळे ठेकेदाराचे काम बंद होते.
(३) हे खरे आहे.
(४) राहुरी फॅक्टरी येथे मे २०२२ मध्ये एक दिवसाचे आंदोलन करण्यात आले होते. आंदोलन दरम्यान कंत्राटदाराने दिलेल्या आश्वासनानुसार सुरक्षतेसाठी आवश्यक असणारे फलक कंत्राटदाराने लावले आहेत. तसेच कंत्राटदाराने रस्त्याचे खड्डे भरले आहेत.
(५) रस्त्यावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर कामावर देखरेख करणा-या ॲथॉरिटी इंजिनियरने वेळोवेळी सुरक्षिततेचा आढावा घेऊन ठेकेदारास सूचना दिलेल्या आहेत.ॲथॉरिटी इंजिनियर च्या अहवालानुसार प्रकल्प रस्त्यावर ठेकेदाराने आवश्यक उपाययोजना केलेल्या आहेत.

---

### मुंबईतील मीरा - भाईंदर येथील औद्योगिक तसेच निवासी क्षेत्रातील प्रदूषित पाणी खाडी व समुद्रात सोडले जात असल्याबाबत

**(२८) ४५५२३ (१७-०९-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मीरा - भाईंदर येथील औद्योगिक व निवासी क्षेत्रातील प्रदूषित पाणी खाडी व समुद्रात सोडले जात असल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होवून मासेमारी तसेच मीठ व्यवसाय देखील बंद होत आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०१-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) मिरा-भाईंदर महानगरपालिका हददीतुन निर्माण होणाऱ्या ११८.५ दशलक्ष लिटर घरगुती सांडपाण्यापैकी ८५.५ दशलक्ष लिटर घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया / अंशत: प्रक्रिया करुन उर्वरीत ३३ दशलक्ष लिटर अप्रक्रियाकृत घरगुती सांडपाणी खाडीमध्ये सोडण्यात येत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यानूसार, मिरा-भाईंदर महानगरपालिकेस पर्यावरण संवर्धनासाठी खर्च करण्याबाबत उपाय खर्च म्हणून रक्कम रु. ५.१५/- लाख महानगरपालिकेच्या स्वतंत्र खात्यामध्ये जमा करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नोटीस बजाविण्यात आलेली आहे.

• तसेच मिरा – भाईंदर महानगरपालिकेने मलशुध्दीकरण केंद्र, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नामावलीनुसार कार्यान्वित करणे व Online OCEMS (Effluent) बसविण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक १२/१०/२०२० रोजी नोटीस बजाविण्यात आली असून याबाबत महानगरपालिकेकडून कार्यवाही सुरु आहे.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मिरा – भाईंदर महानगरपालिकेच्या एकूण ८ मलशुध्दीकरण केंद्राच्या करण्यात आलेल्यापाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दिनांक ०२/१२/२०२१ रोजी नोटीस बजाविण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने दिनांक ३१/१२/२०२१ रोजी प्रत्यक्ष सुनावणी घेण्यात आलेली होती. तसेच दिनांक १९/०१/२०२२ रोजी तात्काळ अनुपालन करण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेला अंतरिम निर्देश बजावण्यात आले होते.

• तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेस दिनांक ०४/०४/२०२२ रोजी न्यायालयीन खटला दाखल का करु नये याबाबत नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेने सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेत सुधारणा केली असल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पाहणीदरम्यान निदर्शनास आले आहे.

• उर्वरित ३३ दशलक्ष मि. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याच्या अनुषंगाने भाईंदर पश्चिम, नाजिरनाथ चर्च येथे ८ दशलक्ष घन/मि सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारण्यासाठीचे बांधकाम पूर्ण झाले असून ३०/०६/२०२३ पर्यंत हा प्रकल्प कार्यान्वित होणार आहे खारीगाव, शिवशक्ती नगर येथे १३ दशलक्ष घन/मि. सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे काम पूर्ण झाले आहे. तसेच घोडबंदर काशीगाव येथे १४ दशलक्ष घन/मि. प्रकल्प प्रस्तावित असून त्याचे बांधकाम सुरु होणे बाकी आहे.

• मिरा भाईदर महानगरपालिका हददीतील जलप्रदूषणकारी ४ उदयोगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उत्पादन बंद करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंडवाना (जि.गडचिरोली) विद्यापीठाला आदिवासी व वन विद्यापीठाचा दर्जा मिळण्याबाबत**

**(२९) ४५६०१ (२०-०९-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडवाना (जि.गडचिरोली) विद्यापीठाला आदिवासी व वन विद्यापीठाचा दर्जा देण्यात येईल अशी घोषणा मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजा अडपल्ली येथील जमीनीच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू असून सदर प्रक्रियेसाठी ३४ कोटी ५० लक्ष रूपयांची आवश्यकता असल्याने गोंडवाना विद्यापीठाने शासनाकडे निधीची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठाचा परिसर सर्वांगसुंदर व्हावा तसेच येथील विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण मिळण्यासाठी सदर निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१६-०१-२०२३) :**(१)हे खरे नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे;

मौजा, अडपल्ली ता. जि.गडचिरोली येथील ७८.१७ हे.आर. खाजगीपैकी उर्वरित ६४.०२ हे.आर. जमिनीची खरेदीची प्रक्रिया सुरु करण्याकरीता रु.५६,१८,५६,००८/- इतक्या निधीची जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी विद्यापीठास मागणी सादर केली होती.

सदर मागणीस अनुसरुन, विद्यापीठाने रु.३६,९५,१६,०३२/- निधी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे वर्ग केला आहे. तसेच आणखी रु. १०,५३,०६,४७९/- रक्कम विद्यापीठाकडून जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांचेकडे वर्ग करण्यास शासन मान्यता देण्यात आली असून, पुढील कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापोली (जि. रत्नागिरी) तालुक्यातील भोपण ते दाभिक खाडीवर पुल बांधण्याबाबत**

**(३०) ४५६१५ (२१-०९-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि रत्नागिरी) तालुक्यातील भोपण ते दाभिक खाडीवर मोठया पुलाचे बांधकाम करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी व ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने पुलांच्या बांधकामाकरिता किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे व सदर पुलाच्या बांधकामास कधीपर्यंत सुरुवात होणार आहे,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०१-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्ता हा अवर्गीकृत रस्ता असून तो या विभागाच्या अखत्यारीत येत नसल्याने या विभागामार्फत कार्यवाही करणे प्रस्तावित नाही.

त्यामुळे भविष्यात हा रस्ता दर्जोन्नत झाल्यानंतर, रस्त्याच्या दर्जानुसार सदर रस्त्याचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून संबंधित विभागाद्वारे करणे शक्य होईल.

---

**पुसद-वाशिम रस्ता व पुसद –दिग्रस, पुसद-खडका व पुसद- शेबाळपिंपरी (ता.पुसद, जि.यवतमाळ) रस्त्यांच्या खोदकामातून निघालेल्या गौणखनिजांची पस्पर विल्हेवाट लावून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत**

**(३१) ४५६६६ (२५-०९-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद, (जि. यवतमाळ) येथील राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत पुसद-वाशिम रस्ता व पुसद –दिग्रस, पुसद-खडका, पुसद- शेबाळपिंपरी रस्ता या रस्त्यांचे खोदकाम करुन कंत्राटदाराने खोदकामातून निघालेले गौणखनिजांची परस्पर विल्हेवाट लावून शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान केल्याचे माहे मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (११-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

रस्त्याच्या खोदकामात निघालेले मटेरियल मातीचा भराव, बाजुपट्टी, रस्त्याचे दुभाजक, गावाच्या जोड रस्त्याकरीता व पुलाच्या पोचमार्गामध्ये वापरण्यात आले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३२) ४५७३३ (१७-०९-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सेवानिवृत्त शिक्षकांची संख्या वाढत असून त्यांच्या रिक्त पदांमुळे शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे दिनांक ८ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांच्या कमतरतेमुळे कार्यरत शिक्षकांवरील अध्यापनाचा ताण वाढत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून २०१७ पासून संच मान्यता आणि शिक्षक भरती प्रलंबित असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबतची मागणी सामान्य नागरिक, सेवाभावी संस्था व लोकप्रतिनिधींनी केली असल्याचे हि निदर्शनास आले आहे, हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०७-१२-२०२२) :**(१) व (२) अंशत:खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्यास वित्त विभागाची मान्यता घेण्याचे प्रस्तावित आहे. तसेच शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चे आयोजन आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्याच्या सूचना शासन पत्र दिनांक ०७.११.२०२२ अन्वये दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील पंचगंगा नदी पात्रातील प्रदूषणाबाबत

**(३३) ४५९८० (१७-०९-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील पंचगंगा नदी पात्रातील प्रदूषणामुळे अनेक मासे व जलचर प्राण्यांचा मृत्यू होवून दुर्गंधी पसरल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीती काय निदर्शनास आले व तदनुसार पंचगंगा नदी पात्रात प्रदूषण करणाऱ्या कोणत्या कंपन्या किंवा इतर घटकांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रश्नाधीन विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक १५/०५/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान टाकवडे येथील घरगुती सांडपाणी वाहून नेणारे पंपींग स्टेशन दुरुस्ती कामासाठी बंद असल्याचे आढळून आले होते.
• इचलकंरजी शहरातून निर्माण होणाऱ्या ४० द.ल.लि. सांडपाण्यापैकी २० द.ल.लि. प्रतिदिन इतके सांडपाणी अंशत: प्रक्रिया करुन व उर्वरित २० द.ल.लि. प्रतिदिन इतके सांडपाणी कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या विविध नाल्याव्दारे पंचगंगा नदीत मिसळत असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांना दिनांक १८/०५/२०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिंचवड (जि.पुणे) येथील सायन्स सिटीचे काम सुरु करण्याबाबत

**(३४) ४६८०० (१७-०९-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील पिंपरी-चिंचवड येथे सायन्स पार्क शेजारी साडेसात एकर परिसरात शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने जागतिक दर्जाचे भारतरत्न राजीव गांधी विज्ञान अविष्कार नगरी सायन्स सिटी उभारण्याच्या निर्णयाला दिनांक १ सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्या सुमारास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिंचवड येथील सायन्स पार्क शेजारी जागतिक दर्जाचे भारतरत्न राजीव गांधी विज्ञान अविष्कार नगरी सायन्स सिटी उभारण्याचे काम निविदा मंजूर करण्याअभावी राज्य शासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सायन्स सिटीची उभारणी नियोजित वेळेत पूर्ण करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१४-१२-२०२२) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.
जमीन प्राप्त करून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.
(३) जमीन प्राप्त करून घेण्यासाठी PMRDA व PMC/PCMC यांचेकडे पाठपुरावा सुरू असून त्याअंती पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कंडारी (ता.भुसावळ, जि.जळगांव) येथील ग्रामपंचायत परिसरातील सांडपाणी व दिपनगर येथील राख मिश्रित पाणी प्रक्रिया न करता तापी नदीपात्रात सोडण्यात येत असल्याबाबत**

**(३५) ४६९३७ (१७-०९-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कंडारी (ता.भुसावळ, जि.जळगांव) येथील ग्रामपंचायत परिसरातील सांडपाणी व दिपनगर येथील राख मिश्रित पाणी हे कुठलीही प्रक्रिया न करता तापी नदीपात्रात सोडण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सांडपाणी हे भुसावळ शहरासाठी पुरवठा करण्यात येणाऱ्या पाणी साठयात मिसळत असल्यामुळे नागरिकांना विविध आजार होण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रक्रिया न करता दुषित पाणी तापी नदीपात्रात सोडणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०१-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
कंडारी ग्रामपंचायतीचे शोष खड्यातून निघणारे अतिरिक्त घरगुती सांडपाणी तापी नदीपत्रात अंशत: मिसळत असल्याचे निदर्शनास आले होते.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पाहणीदरम्यान कंडारी गावामधून सांडपाणी मिश्रीत पावसाचे पाणी तापी नदीपात्रात जात असल्याचे आढळून आल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत ग्रामपंचायत, कंडारी यांना जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ढाणकी ते बिटरगाव या ( जि. यवतमाळ) रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(३६) ४७०८८ (११-११-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ढाणकी ते बिटरगाव (जि.यवतमाळ) येथील रस्त्यांची दुरवस्था झाली असून या रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता स्थानिक मागील दोन वर्षापासून विविध आंदोलने करीत असूनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकांनी रास्ता रोको आंदोलन केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०१-२०२३) :** (१) आंदोलन झाले, हे खरे आहे.
(२) सदर रस्त्याच्या साखळी क्र. कि.मी. ०/०० ते ४/०० या लांबी मध्ये खड्डे भरणेचे काम वेळोवेळी करण्यात येते. साखळी क्र. कि.मी. ४/०० ते ७/४०० या लांबीत रस्ता सुधारणा करणेचे काम प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात देशातील पहिले पाठ्यपुस्तक संग्रहालय उभारण्याबाबत**

**(३७) ४७३६३ (१७-०९-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात देशातील पहिले पाठ्यपुस्तक संग्रहालय उभे राहणार असून याबाबत शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू संग्रहालय कुठे व कधीपर्यंत उभारण्यात येणार आहे तसेच संग्रहालयाचा आराखडा तयार करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदर संग्रहालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१४-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) संग्रहालय पाठ्यपुस्तक मंडळाच्या ई-बालभारती जागेवर उभारण्याबाबत प्रस्ताव आहे. तांत्रिक सल्लागार नेमणुकीसाठीचा विषय नियामक मंडळाच्या सभेमध्ये ठेवण्यात आला आहे. संग्रहालयाचा आराखडा सल्लागाराची नेमणूक झाल्यानंतर करण्यात येईल.
(३) नियामक मंडळाची मान्यता मिळाल्यावर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तामसा (ता.हादगाव, जि. नांदेड) येथील विश्रामगृह सुस्थितीत असतानाही पुन:श्च दुरुस्तीस मंजूरी दिल्याबाबत**

**(३८) ४७५२० (२१-०९-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तामसा (ता.हदगांव, जि. नांदेड) येथील विश्रामगृह सुस्थितीत असताना सन २०२२- २०२३ या आर्थिक वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात दुरूस्तीची कामे अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, नांदेड यांनी मंजुर केली असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,असल्यास चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही,
तामसा, ता.हदगांव, जि. नांदेड येथील विश्रामगृहाची इमारत जुनी व मोडकळीस आलेली असल्याने

दि.०४.०३.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर विश्रामगृहाच्या सुधारणा व विस्तारीकरणाच्या रु.७३.५९ लक्ष किमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार विस्तारीकरणाचे काम प्रगतीत आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे सुत व्यापाऱ्यांकडून सुताचा सट्टे बाजार व साठेबाजी सुरु असल्याबाबत**

**(३९) ४७७४८ (०१-११-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे सुत व्यापाऱ्यांकडून सुताचा सट्टे बाजार आणि साठेबाजी मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शहरातील गोदामे तपासण्याची पॉवरलूम असोसिएशनने मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१६-०१-२०२३) :** (१) सुत व्यापारांकडून सुताचा सट्टे बाजार व साठेबाजी मोठ्या प्रमाणात सुरु असल्याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झाले नाही. परंतू कोल्हापूर येथील स्थानिक वर्तमानपत्रात दि.०९ मे २०२२ रोजी याबाबत बातम्या प्रसिद्ध झाल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.
(२) नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू समुद्रकिना-यावरील भागात भरतीचे पाणी रोखण्यासाठी धूप प्रतिबंधक बंधारा व दगडी भिंत बांधण्याबाबत**

**(४०) ४७८४४ (३१-१०-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) समुद्रकिना-यावरील धाकटी, डहाणू, डहाणू गाव, सतीपाडा, आगर, नरपड या गावातील मच्छिमारांच्या घरात मागील कांही वर्षापासून पावसाळ्यात समुद्राच्या भरतीचे आणि उधाणाचे पाणी शिरुन मोठे नुकसान होत असल्याचे माहे जून २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भरतीचे पाणी रोखण्यासाठी धूप प्रतिबंधक बंधारा व दगडी भिंत बांधण्याची मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, पालघर व मेरीटाईम बोर्डाकडे वारंवार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने धूप प्रतिबंधक बंधारा व दगडी भिंत बांधण्याच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा याबाबतची सद्यःस्थिती काय आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०६-१२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) डहाणू गांव, ता.डहाणू जि.पालघर येथे समुद्र धूप प्रतिबंधक बंधारा बांधणे या कामास सन २०२१-२०२२ चे अर्थसंकल्पात रु.४.५०कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकाची निविदा प्रक्रिया सुरु आहे. उर्वीरित कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यात शासकीय कंत्राटदार यांनी केलेल्या निकृष्ट कामाबाबत**

**(४१) ४७९३२ (३१-१०-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात शासकीय कंत्राटदार श्री. आर.के.संचेती यांनी केलेल्या निकृष्ट कामाबाबत अधिक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ अमरावती यांचे मार्फत चौकशी आदेशीत करण्यात आली असुन चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त चौकशी अहवालानुसार दोषी असलेले अधिकारी व शासकीय कंत्राटदार श्री. आर.के.संचेती यांचेवर कारवाई करण्याबाबात आदेश देण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणी चौकशी आदेशीत करण्यात आली होती. परंतु मा. आमदार महोदयांनी दि. २३.०२.२०२२ च्या पत्रान्वये तक्रार मागे घेतली असल्याचे कळविल्यामुळे दक्षता व गुण नियंत्रण मंडळामार्फत चौकशी केलेली नाही.

(२) (३) (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदुरा(जि. बुलढाणा) रेल्वे क्रॉसिंगवर (आर.यू.बि.) भुयारी मार्ग कार्यान्वीत करण्यास मंजुरी मिळण्याबाबत**

**(४२) ४७९३४ (३१-१०-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांना भुयारी मार्ग मार्गाची व्यवहार्यता तपासली असता भुयारी मार्ग व्यवहार्य नसल्याने भुयारी मार्ग ऐवजी उड्डाणपूल बांधण्याचा प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व रस्ते वाहतूक आणि राजमार्ग मंत्रालय मंजुरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावावर उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व रस्ते वाहतूक आणि राजमार्ग मंत्रालय यांचेकडून लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने निधीची पुर्तता करण्याबाबत विचारणा करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व रस्ते वाहतूक आणि राज्य मार्ग मंत्रालय यांचेमार्फत लवकरात लवकर निधी मंजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) उड्डाणपुलाच्या बांधकामाचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते परिवहन मंत्रालय,भारत सरकार यांचे वार्षिक नियोजन २०२२-२३ मध्ये समाविष्ट करण्याकरीता प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा तालुक्यातील रस्ते दर्जोन्नत करून सुधारणा करण्याबाबत.**

**(४३) ४८११९ (३१-१०-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील हिप्परसोगा-कातपूर लातूर तसेच औसा-वानवडा-तुंगी-माळकोंडजी ते मातोळा हे दोन्ही इतर जिल्हा मार्ग रस्ते प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने मंजुरीसाठी रीतसर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत पालकमंत्री, लातूर यांनी सदर बैठकीत निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी रस्ते दर्जोन्नत करण्याबाबत व सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०१-२०२३) :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) दिनांक २०/०७/२०१६ च्या शासन निर्णयानुसार विहित केलेल्या बाबींच्या पुर्ततेसह आवश्यक प्रस्ताव शासनास अप्राप्त.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड-वारंगा (ता.अर्धापूर जि.नांदेड) महामार्गावरील रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(४४) ४८२०३ (३१-१०-२०२२). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यात नांदेड-वारंगा राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याचे काम सुरु असल्याने या रस्त्यावर सर्वत्र खड्डे पडले असून अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खड्डयांत मातीमिश्रीत मुरुम टाकल्याने मोठया प्रमाणात धूळ पसरत असून धुळीमुळे या रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतातील पिकांचे अतोनात नुकसान होत असून येथील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथे उडणाऱ्या धुळीवर प्रतिबंध करण्यासाठी व रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०१-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
केंद्र शासनाच्या अखत्यारीतील राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ वरील लोहा ते वारंगा या पॅकेजमध्ये अर्धापूर तालुक्यातील मार्गाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.
सन २०२१ च्या पावसाळयात सततच्या मुसळधार पावसामुळे महामार्गावर खड्डे पडले होते. त्यामुळे GSB आणि WMM या सामूग्रीने आवश्यक तेथे दुरुस्ती केली तसेच पावसाळयानंतर डांबरी करण करुन सर्व खड्डे दुरुस्त करुन रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात आला. त्यामुळे धुळीमुळे पीकाचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोट येथील सरस्वतीनगर येथे नाला बंद करण्यात आल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(४५) ४८९८३ (२५-०९-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील अकोट येथील सरस्वतीनगर नजीक राधे राधे कॉलनीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याचे काम सुरू असताना दुसरा सांडपाण्याचा नाला बंद करण्यात आल्याने स्थानिक लोकांचे आरोग्य धोक्यात आल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने सांडपाण्याचा नाला बंद केल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली असून या कॉलनीतील नाला स्वच्छ व सुरळीत करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन दुरुस्ती विषयक कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) अशा प्रकारची मागणी अभिलीखीत नाही.
(३) सदर रस्त्याचे काम सुरु असतांना लगतच्या नालीचे काम सुरु असल्याने राधे राधे कॉलनीतील नाली बंद होती. आता या रस्त्याचे व त्याच्या लगतच्या नालीचे काम पूर्ण करण्यात आले असून, राधे राधे कॉलनीतील कच्च्या नालीतील सांडपाण्याचा योग्य प्रकारे निचरा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिपळूण व गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रस्त्यांना दर्जोन्नती मिळण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

**(४६) ४९७५४ (१८-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खेरशेत-कोकरे-कोकरे-नायशी-कळंबुशी-कासे-पेढांबे रस्ता प्रजिमा ३८ या मार्गामध्ये वीर लोहारवाडी ते वीर देवपाट, घेवडेवाडी, बंदरवाडी रस्ता, (ग्रामा १०३) व वीर लोहारवाडी रानपाट वीरबंदर रस्ता (ग्रामा १५८), शृंगारतळी मळण-निवोशी-पालशेत या रस्त्यांच्या दर्जोन्नतीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. ५/७/२०२१, दि. २१/१२/२०२१ तसेच त्यानंतरही अनेकदा पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने या रस्त्यांना दर्जोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास त्याची कारणे काय आणि या कार्यवाहीस विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे ?

**श्री. रविंद्र चव्हाण (३०-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वीर लोहारवाडी ते वीर देवपाट, घेवडेवाडी, बंदरवाडी रस्ता व वीर लोहारवाडी रानपाट वीरबंदर रस्ता हे दोन ग्रामीण रस्ते दर्जोन्नत करुन त्यांचा प्रजिमा-३८ मध्ये समावेश करण्याबाबतचा शासन निर्णय दि.१४/११/२०२२ रोजी तसेच शृंगारतळी-मळण-निवोशी-पालशेत या रस्त्यांच्या दर्जोन्नतीचा शासन निर्णय दि.०९/१२/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) सेक्टर ४ ई परिसरातील शासकीय वसाहतीची झालेली दुरवस्था

**(४७) ५२४७५ (१८-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) सेक्टर-४ ई परिसरातील शासकीय वसाहतीची दुरवस्था झाली असून सर्वत्र पसरलेल्या घाणीच्या साम्राज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारतीच्या दुरुस्तीची कामे संथ गतीने सुरु असून त्याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून वसाहतीच्या दुरूस्तीच्या कामाकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित विभागाच्या अधिका-यांवर कारवाई करणे तसेच वसाहतीच्या दुरूस्तीचे काम तातडीने पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (३०-०१-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
कळंबोली शासकीय वसाहतीमध्ये इमारत दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असून दुरुस्तीमधून निघालेले साहित्य व कचरा जमा करुन वेळोवेळी डंपिंग ग्राऊंडला हलविण्यात येतो.
(२) व (३) हे खरे नाही,
कळंबोली के एल ४, सेक्टर ४ ई मध्ये एकूण १६ इमारती आहेत. सदर इमारतींचे लेखापरिक्षण सन २०१९ मध्ये करण्यात आले आहे. लेखापरिक्षणामध्ये सुचविल्याप्रमाणे आवश्यक बाबींचा अंतर्भाव करुन तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार १६ इमारतींच्या निवासस्थान दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता देऊन व निविदा प्रक्रिया पार पाडल्यानंतर १६ इमारतींच्या कामांपैकी ०७ इमारतींच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. सदर ७ इमारतीमधील एकूण ५६ निवासस्थानांपैकी ३९ निवासस्थानांच्या विविध स्थापत्य दुरुस्तीची कामे पुर्ण झाली आहेत व विद्युतीकरणाची कामे प्रगतीत आहे. उर्वरीत १७ निवासस्थानात रहिवाशी वास्तव्यास असल्यामुळे तेथील काम सुरु करण्यात आलेले नाही. विद्युतीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर रहिवाश्यांना तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करुन उर्वरीत १७ निवासस्थानाची दुरुस्तीची कामे सुरु करण्याचे नियोजन आहे. तसेच उर्वरीत ९ इमारतींची निविदा प्रक्रिया चालू असून कार्यारंभ आदेशानंतर सदर काम लवकरच हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील सेवा निवृत्त प्राथमिक शिक्षकांना निवृत्तीवेतन अदा करण्याबाबत**

**(४८) ५४९६९ (२६-१२-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील सेवा निवृत्त प्राथमिक शिक्षकांना निवृत्तीवेतन अद्यापपर्यंत मिळाले नसल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत निवृत्तीचे वेतन मिळत असताना या वर्षी दिवाळीपासूनचे वेतन सेवा निवृत्त शिक्षक तसेच सरकारी कर्मचा-यांना अद्यापपर्यंत मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्यामुळे निवृत्त शिक्षक तसेच सरकारी कर्मचा-यांना वेतन मिळण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सेवा निवृत्त प्राथमिक शिक्षकांना तातडीन वेतन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२७-१२-२०२२) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) माहे नोव्हेंबर, २०२२ चे निवृत्तीवेतन अदा करण्यासाठी निधी प्राथमिक संचालनालयाकडून जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्यासाठी जमीनीचे भूसंपादन करण्याबाबत

**(४९) ५५०२८ (१८-०१-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय यांच्या कामाचा भाग म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याद्वारे महाराष्ट्र राज्यातील महामार्ग एन एच -६५२ नळदुर्ग -अक्कलकोट सेक्शन या ३९.८२५ किमी लांबीच्या राष्ट्रीय महामार्गाचे प्रमुख उद्देषित राष्ट्रीय महामार्ग सेक्शनमध्ये विकसन आणि अद्यावतीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्यातील महामार्ग एन एच -६५२ नळदुर्ग -अक्कलकोट सेक्शन या ३९.८२५ किमी लांबीच्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाकरिता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, रा.मा क्र. ६५२ नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्यासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई च्या औरंगाबाद खंडपीठाने भूसंपादनाचे आदेश दिले आहेत हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुंषगाने भूसंपादन करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. २०.०१.२०२२ रोजी प्रलंबित अस्तित्वातील रस्त्याच्या रुंदीच्या दाव्याबाबत निकाल दिलेला असुन त्या अन्वये नेमकी रुंदी ठरविण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, उस्मानाबाद तसेच सोलापूर यांच्या देखरेखीखाली संयुक्त मोजणीचे आदेश पारीत केलेले असून आावश्यकता भासल्यास भुसंपादन प्रक्रिया राबविण्याबाबत सुचविले आहे.
(४) संयुक्त मोजणीचे काम दोन्ही जिल्हयात पूर्ण झाले असुन भुमी अभिलेख विभागाने अस्तित्वातील रस्त्याचे क्षेत्र न वगळता संयुक्त मोजणी अहवाल सादर केले आहेत. यास कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग,सोलापूर यांनी हरकत घेतली असुन अभिलेख्याप्रमाणे तसेच अस्तित्वातील शासकीय वहिवाटीच्या रस्त्याचे क्षेत्र वगळुन संयुक्त मोजणी अहवाल व नकाशे फेर सादर करणेबाबत कळविले आहे.
(५) सदर राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीबाबत असल्याने वस्तुस्थितीबाबत वरिष्ठ कार्यालयामार्फत भुपृष्ठ व परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांना कळविले आहे.तथापी सदर बाबतीत भुपृष्ठ व परिवहन मंत्रालय,नवी दिल्ली यांचा निर्णय अंतिम असल्याने व सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याने याबाबत योग्य निर्णय झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

---

## मौजे यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथे नवीन शासकीय विश्रामगृहाचे बांधकाम करण्याबाबत.

**(५०) ५५१३६ (१८-०१-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथे नवीन शासकीय विश्रामगृह बांधण्यासाठी निधी मिळण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी माहे फेब्रुवारी, २०२२ पासून वारंवार केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उप सचिव बांधकामे यांना पाठवून विश्रामगृह बांधण्यासाठी निधी मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (३०-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कोणत्याही बांधकामास निधी मिळण्याकरिता प्रथम कामास प्रशासकीय मान्यता मिळणे क्रमप्राप्त आहे. सबब, सदर प्रकरणी प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची धारिका सादरीकरणाच्या टप्प्यात असून निधीच्या उपलब्धतेच्या अधिन राहून प्रस्तावाबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.